म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. 9340
सन १९५८

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# श्रद्धा गीतें




REFBK-0009417
REFBK-0009417

सेन्ट्रल प्रकाशन
मुंबई. ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ....... वि: .......
क्रमांक ....... नों: दि: .......

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर
# श्रद्धा गीतें

कवि :—साहेबराव कोकाटे



REFBK-0009417
REFBK-0009417

बुद्धवासी डॉ. बाबासाहेब आंबेडकर

प्रकाशक
एफ्. बी. बुऱ्हाणपुरवाला
न्यू चर्नी रोड, मुंबई ४

मुद्रक
के. एल्. एन्. राव
मुंबई वैभव प्रेस, गिरगांव, मुंबई ४.

चित्रकार : यशवंत मयेकर

किंमत ३ आणे

सेन्ट्रल प्रकाशन मुंबई ४.

जगांत आले मानवाचें रूप घेऊन।
सात कोटी दलितांचे बैसले दैवत होऊन

भजन चालले घरोघरीं जयजय भीमराया।
सान थोर अन् वृद्ध लागती भीमाचे पाया।

प्रतेकाच्या नयनी अश्रू, दुःख असे हृदयी।
भीमाविना या दलिताचा आधार दुजा नाही।

सात कोटी लेकरांची जणू गेली आई।
हंबरती वासरे सोडूनी गेल्या जणू गाई।

म्हणे कोकाटे शपथ घेतली भीमराया चरणी।
सदैव अन्यायांशी झटेल ही माझी लेखणीं।

कवि-साहेबराव कोकाटे

# गर्जा जयजयकार

( चाल : स्वतंत्र )

दा. क्र. ९४१५

गर्जा जयजयकार – जयकार जयजयजयकार
भगवान गौतमाचा – गर्जा जयजयकार ॥

दया क्षमा अन् शांती वसे जया ठाई ।
भीमराया सम महा पुरुष लागले जया पाई ।
दिन दुबळया, पद दलितांचा तोच एक आधार ।
तयाचा गर्जा जयजयकार – जयजयकार ॥

समानतेचा पाठ शिकवी, पाठ शिकवी ।
मुक्तीचा तो मार्ग दाखवी, मार्ग दाखवी ।
बुद्ध जगी अवतरला, करण्या मानवी उद्धार ।
तयाचा गर्जा जयजयकार – जयजयकार ॥

शरण जो बुद्धाला जाई, बुद्धाला जाई ।
बुद्धीवान तो मानव होई, मानव होई ।
दर्शन मात्रे दूर होतो जीवनातील आंधार ।
तयाचा गर्जा जयजयकार – जयजयकार ॥

उच्च, नीच हा भेदभाव जगा मध्ये नको उराया
याच साठी झटला अपुला बाबा भीमराया ।
अन्यायाशी झटण्या साठीं व्हा आता तयार ।
भगवान गौतमाचा गर्जा जयजयकार ।
बुद्धं सरणं गच्छामि – बुद्धं सरणं गच्छामि ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २९४८४ वि: ७५१०४
क्रमांक ९३५० नों: दि: १५५५४०

# लीला जगा वेगळी

( चाल :— मुरली बैरन भई ) नई देहली

लीलाऽऽऽलीला जगावेगळी, भीमराया तुझी लीला जगावेगळी ॥
तु आम्हा ऽऽदलितांची माऊली, भीमराया तुझी लीला जगावेगळी॥

एक निराळा जगावेगळा, मार्ग आम्हां दाऊनी
तान्ही लेकरें सोडून येथे, बसला कुठे जाऊनीं
ही अमुची ऐका जरा आरोळी, भीमराया तुझी लीला जगावेगळी १

सांगरे बाबा काय एवढा, गुन्हा आम्हीं केला
कोणावर सोडून आम्हाला, निघून तू गेला
जीवाला चैन नसे रे मुळी, भीमराया तुझी लीला जगावेगळी ॥ २ ॥

एकांत स्थानी रडते जैसे, आईविना लेकरू
हंबरडा फोडीते जैसे, गाईविना वासरू
तुझ्याविन जीव तैसा तळमळी, भीमराया तुजी लीला जगावेगळी ३

झडकरी धाऊनी येई बाबा, वेळ नको लाऊ
निर्बल दीन दुबळ्या दलितांचा, अंत नको पाहूं
देऊनी बसलास कोठे दडी भीमराया तुझी लीला जगावेगळी ॥ ४ ॥

युग प्रवर्तक हे महापुरुषा, वंदन तव चरणीं
घरो घरी मी पोचवीन बाबा तुझी मधुर वाणी
तुला ही श्रद्धांजली अर्पीली, भीमराया तुझी लीला जगावेगळी ॥ ५ ॥

# अमर उपकार

( चालः— हमलाये है तुफानसे ) जागृति

ही नांव दलितांची किनाऱ्याला आणूनी ।
ते भीमराव आज आम्हां गेले सोडूनी ॥
बौद्ध धर्म मुक्तीचा मार्ग दाऊनी ।
ते भीमराव आज ............

अहो हक्कासाठीं झटणें त्यांनीच शिकविले ।
दलितांना संकटात त्यांनीच रक्षीले ।
दलितांचे बौद्ध युग हे त्यांनीच निर्मीले ।
वंदन त्यांना अमुचे हे हात जोडूनी ।
ते भीमराव आज............

उपकार कधीं त्यांचे विसरणार ना आम्ही ।
देऊ झुंज अन्यायाशी कधीं भिणार ना आम्हीं ।
धैर्याने पुढें जाऊ मागे हटणार ना आम्हीं ।
निघालो भीम चरणांची शपथ घेऊनी ।
ते भीमराव आज............

संदेश देऊ शांतीचा साऱ्या जगाला ।
देतील आशिर्वाद ते भीम आम्हांला ।
सारे मिळून आता जय भीम बोला ।
एकीचा झेंडा हाती घ्या, चला मिळोनी ।
ते भीमराव आज............

# ते बाबा भीमराया

( चालः— अजब है दुनिया ) नया आदमी

तोडून अमुची माया-ते बाबा भीमराया
कां बरं परलोकी गेले रहाया ॥ तोडून अमुची...

सात कोटी दलितांचे दैवत गेले।
एका दिव्य जीवनाचे निर्वाण झाले।
बुद्धांच्या कुशीत विश्रांती घ्याया ॥ तोडूनअमुची...

आता आम्ही मारावी हांक कुणाला।
रक्षील संकटांत कोण आम्हांला।
दुःखात येईल कोण धीर द्याया ॥ तोडून अमुची...

आम्हां दीन दुबळयांचे भाग्य विधाता।
आम्हीं लेकुरें त्यांची ते अमुचे पीता।
आले जगीं भीमराव आम्हां उद्धाराया ॥ तोडून अमुची...

क्षणो क्षणी आठवते ती भीम मुर्ती।
भीम नाम घेता दुःख सारे टळती।
आम्हां वरी राहील त्यांची प्रेम छाया ॥ तोडून अमुची...

आम्हां जन्मो जन्मी असे देव लाभावे।
पिता रामजीचे ते पुत्र रत्न चौदावे।
याहो भीमबाबा आता दर्शन द्याया ॥ तोडून अमुची...

# अंधार झाला

( चालः— जारी जारी ओ कारी बदरीया ) आझाद

पहा अंधार हा कैसा झाला ।
गोर गरीबांचा आधार गेला ।
दिन दलितांचा सुर्यास्त झाला ।
पहा अंधार हा कैसा झाला ॥ १ ॥

कसा अदृश्य झाला प्रकाश।
दृष्ट कोणाची लागली त्यास ॥
अमुची श्रद्धा खरी, भीमरायावरी,
कां सोडून गेले आम्हांला ।। पहा अंधार ॥

जेव्हा जगानें छळले आम्हांला ।
दलितानंद तो धाऊन आला ॥
झाला भीमावतार, अमुचा करण्या उद्धार,
स्वाभिमान त्याने शिकवीला ॥ पहा अंधार ॥

नाही वाटली मृत्युला लाज ।
गेला घेऊन अमुच्या बाबांस ॥
ओस दाही दिशा, पहा झाल्या कशा,
काळ वैऱ्याने घात केला ॥ पहा अंधार ॥

# दलितांचा भगवान

( चालः— कितना बदल गया इन्सान ) नास्तिक

उद्धार केला दिन दलितांचा, शिकविला अभिमान।
भीम ते दलितांचे भगवान। भीम ते दलितांचे भगवान।
पूर्ण जाहले आज गड्यांनो भीम गीतेचें लिखाण।
भीम ते दलितांचे भगवान १॥

जातीयवादी दुष्टांनी जेव्हां, भीम बाबांना दूर लोटले।
महार आणि चांडाळ म्हणोनी, मन त्यांचे दुखविले।
क्रोधायमान होऊनी भीम ते जगा पुढे पहा गर्जले।
दृढ निश्चय मग करूनी अपुला, आव्हान त्यांनी केले।
उच्च नीच हे भेद मिटवण्या देईन माझे प्राण।
भीम ते दलितांचे भगवान २॥

केळुसकर गुरुजी जैसे, थोर गुरुजी त्यांना लाभले।
बडोद्याचे महाराज सयाजी, मदतीसाठी धावून आले।
जोतीबा फुल्यांचे भीम बाबांना, शुभ आशिर्वाद लाभले।
भगवान त्या गौतमाने, भीम बाबांचें रक्षण केले।
कहत कबीरा रे भीमराया, तू होशील बलवान।
भीम ते दलितांचे भगवान ३॥

नाशिक महाड येथें त्यांनी, सत्याग्रह रणशिंग फुंकले।
लाखो हरिजन बंधू भगिनी, भीमरायाच्या मागे चालले।

अशा प्रकारे जन क्रांतींत त्या, भीमरावच यशस्वी झाले।
पूढें भारताच्या घटनेचे, शिल्पकारही तेच बनले।
कायदे पंडीताच्या पदावर झाले बिराजमान
भीम ते दलितांचे भगवान् ॥ ४ ॥

उद्धार करूनी हरिजनांचा, आज जगाला सोडून गेले।
एका थोर महात्म्याचे हे, दिव्य जिवन हाय संपले
त्या गौतम बुद्धाच्या हृदयी, बुद्धि निपूण विलिन झाले।
दलित नगरचा राजा गेला, सिंहासन हे खाली जाहले।
शिकऊन गेले परी जगाला सत्य निती इमान।
भीम ते दलितांचे भगवान। भीमते भगवान॥ ५॥


छापून तयार छापून तयार

# दलितांचे बाबा

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचें
चरित्र आणि कार्य
लेखक :—शांताराम पाटील
किंमत ४ आणे
आजच मागणी करा
सेन्ट्रल प्रकाशन, न्यू. चर्नी रोड, मुंबई ४

## साक्षात विश्व भंगले

( चाल :- सोनियाच्या ताटी ) भाऊबीज

दीन दलितांसाठीं-त्या रामजींच्या पोटी
भीमराव जन्मास आले हो- आज आम्हांस सोडून गेले ॥

असा काय आम्हीं अपराध केला ।
राग आला कसला त्या भीमबाबाला ।
बाळें सातकोटी-धाय धाय रडती
लोक दुःखाने व्याकूळ झाले हो-आज आम्हांस.........

भारत मातेचा कंठमणी गेला ।
गोर गरीबांचा कोहिनूर गेला ।
भीमबाबा गेले हे- मन दुःखी झाले ।
अमुचे साक्षात विश्व भंगले हो-आज आम्हांस........

सांगा हो सांगा दोष द्यावा कुणाला ।
कीं रडत बसावे केवळ ह्या नशीबाला ।
एकाच रात्रींत—झाला हा घात ।
काळ वैऱ्याला काय मिळाले हो- आज आम्हांस......

कुणी किती बोला, कुणी म्हणा कांहीं ।
आता भीम बाबा येणारच नाहीं ।
पहा तीन्ही लोकी-गाजे त्यांची कीर्ती ।
जय घोष चोहिकडे चाले हो-आज आम्हांस

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २१८८८ दि: ३।०५

 क्रमांक ७३५० नों: दि: ११ ७।५।५८

# महा तीर्थ

( चाल : कशाला जाऊ पंढरपूरी )

देव रूपी ते भीमबाबा,
महातीर्थ हे तीन्ही जगाचे, उतरले माझ्या घरी
नको मज काशी अन् पंढरी ॥

अंधारात आम्हीं पडलो होतो अंध होऊन ।
ह्या दुनियेने छळले आम्हांला नीच जाणून ।
आले भीम ते जगांत अमुचा प्रकाश होवून ।
त्याच भीमरायाची आम्हीं पत्करली चाकरी,
नको मज काशी अन् पंढरी ॥

भीम मंदीरी कुणाचा कुणाला, विटाळ ना होई ।
मानवाला समानतेच्या, दृष्टीने तो पाही ।
स्पृश आणि अस्पृश भेद हा मुळिंचा हो नाही ।
प्रेम भावे यावे कुणी ही, भीमाचें मंदीरी,
नको मज काशी अन् पंढरी ॥

बुद्धं सरणं गच्छामि हा, मंत्र मुक्तीचा ।
भीमं सरणं गच्छामि हा, श्लोक भक्तीचा ।
संघम सरणं गच्छामि हा, धडाच् एकीचा ।
आता सांगा कमी कशाची, राहिली माझ्या घरी,
नको मज काशी अन् पंढरी ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

# श्री बुद्धाचें भजन

( चालः— स्वतंत्र )

भजन चालले बुद्ध देवाचे, पहा लोकहो घरो घरी।
मानवतेचे दैवत तेची, दिन दलितांचे कैवारी ॥
भजन चालले बुद्ध देवाचे.........

किती गोड हे नाम तयाचे जय जय जय बुद्ध।
बुद्ध बुद्ध तुम्ही जपा रे जन हो हरेल हे दुःख ॥
बुद्ध श्रद्धा मनांत ज्याच्या तो मानव सुखी संसारी।
भजन चालले बुद्ध देवाचे.........

सत्य अहिंसा शिकवी जगाला, हक्कासाठी लढणें।
अपमानाने जगात बारे, व्यर्थ असे हो जगणें ॥
गुलामगिरीचे नको जीवन, स्वतंत्रता असे बरी।
भजन चालले बुद्ध देवाचे.........

सत्य नितीने जगात चाला, मन कोणाचे दुखवू नका।
न्याय जगाला शिकवा तुम्ही, मार्ग चुकिचा दाखवू नका
समानतेने वागा सारे, बादशा असो वा असो भिकारी।
भजन चालले बुद्ध देवाचे.........

एकाच घाटावर पाणी प्यावे, वाघ असो वा बकरी।
प्राणी सारे एकच असता, हा भेद कशाला सांगा तरी।
एकतेची ध्वजा उभारा, अन् जागे व्हा आता तरी।
भजन चालले बुद्ध देवाचे.........

# शोक सभा

( चालः— तेरे द्वार खडा भगवान ) वामन अवतार

ही शोक सभा भरली, लोक हो शांतता ठेवा।
अपुला सूर्य बुडाला आज, जाहला आंधार अपुल्या जगांत।
लोक हो शांतता ठेवा ॥ १ ॥

भीम बाबांचे निर्वाण झाले, माजला हाहाक्कार।
आता आम्हां पद दलितांना, दुसरा नाहीं आधार हो।
अशी कशी उगवली रात की तीने केली ऐसी मात।
लोक हो शांतता ठेवा ॥ २ ॥

दुर्भाग्य हे लाभले आम्हांला, शोक सभा घेण्याचे।
दुःखीत अंतःकरणा ही, शोक गीतें गाण्याचे हो।
पसरली वार्ता ही जगभर, कोसळला दुःखाचा डोंगर
लोक हो शांतता ठेवा ॥ ३ ॥

गेली सावूली आता अमुची, पडलो आम्हीं उन्हांत।
भीमरायाविन दुसरा अमुचा, वाली नाही जगांत।
ते बाबा साहेब भीमराव, संकटी घेत होते धाव
लोक हो शांतता ठेवा ॥ ४ ॥

वक्ते आले बसा श्रोते हो, भाषण ऐका त्यांचे
चरित्र ते सांगतील तुम्हाला; अपुल्या भीमबाबांचे हो।
रडूं नका धरा हो धीर, कां नेत्री भरले तुमच्या नीर
लोक हो शांतता ठेवा ॥ ५ ॥

# बौद्ध जन हो !

( चाल :- असावा नसावा )

बौद्ध धर्मी गेला तुम्ही, लक्ष देऊनी जरा ऐका ।
सत्य नितीने जगांत वागा, खोटे कधीही बोलू नका ।
व्हय जी जी जी ॥ १ ॥

भीमबाबांनी दाखविलेला, मार्ग कधीही सोडू नका ।
अन्यायाशी झगडा तुम्ही, मागे कधीही हटूं नका ।
व्हय जी जी जी ॥ २ ॥

दिन दुबळ्यांना करा साह्यता, मन कोणाचे दुखवूं नका ।
एका गौतम देवा खेरीज, मान कुणा पुढे झुकवूं नका ।
व्हय जी जी जी ॥ ३ ॥

संकट आले जरी तुम्हांवर, तरी मुळिच डगमगूं नका ।
जोर जुलुम करणाऱ्या सत्तेची, भीति मुळी बाळगूं नका ।
व्हय जी जी जी ॥ ४ ॥

सत्य अहिंसा, मानव प्रेम, ह्या गोष्टींना विसरूं नका ।
भीति बाळगा त्या बुद्धाची, दुज्या कुणा घाबरूं नका
व्हय जी जी जी ॥ ५ ॥

एका बुद्ध अन् भीमा खेरीज, शरण कुणाला जाऊं नका ।
उपदेश केला गाण्या मधुनी, राग कुणीहि धरूं नका ।
व्हय जी जी जी ॥ ६ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 29828 वि: ५१०५


 * क्रमांक * 73540 नों: दि: १५:८:५०

[ खास लोकाग्रहास्तव ] हिंदी श्रद्धा गीतें

# क्यों छोड गये

( तर्ज : — तन डोले मन डोले ) नागीन

क्यों छोड गये, मुख मोड गये, वह दलितोंके सरदार रे
कब भारत मे आयेंगे ॥

सात कोटी दिन दलितों को स्वाभिमान सिखलाया।
दूर करके, घोर अंधेरा, प्रकाश हमे दिखलाया।
हाय भाग फुटे, वो भीम रुठे, गरीबोंके तारन हार रे
कब आयेंगे भारत मे ॥ १ ॥

जिनकी याद मे आज रो रहे भारत के नरनारी।
संकट सागर मे डूबी है यह दलितोंकी नगरी।
यह गीत मेरा, है दर्द भरा मै किसे सुनाऊ आजरे
कब आयेंगे भारत मे ॥ २ । ।

अब हमारे कोन सुनेगा, दर्द भरे अपसाने।
कोन आयेगा बीच भंवर की नैया पार लगाने।
भीमराव, तुम जलदी आवो, नांव लगावो पार रे
कब आयेंगे भारत मे ॥ ३ ॥

बिना भीम के इस दुनियामे कोई नही सहारा।
वोहि तो भाई हम गरीबोंकी किस्मत उजियारा।
चरण छुवो जय भीमकहो, सिलके करो पुकार रे
कब आयेंगे भारत मे ॥ ४ ॥

✤

१४७८ दा. क्र.



REFBK-0009417
REFBK-0009417

# स्फुर्ती गीत

( तर्जः— आज हिमालय की चोटीसे ) किस्मत

गूंज रहा जय भीम का नारा, जाग उठा जमाना है।
चले चलो चले चलो, ये दीन दलितों दूर हम को जाना है ॥

खौल रहा है दिलमे दर्या अब नये अमानोंका।
नही है पर्वा हमे किसी की, डर नही तुफानोंका।
बुद्धसरणं गच्छासिका गीत हमको गाना है।
चले चलो चले चलो.........

वैभवशाली बनायेंगे हम इस भारत देशको।
घर घर मे हम पहुंचायेंगे भीम के संदेश को।
जोर जुलुम से टक्कर लेना दिल मे हमने ठाना है
चले चलो चले चलो.........

रोक नही सकेगी हमको, दुनियाकी ताकत कोई।
राह चले हैं जब हम सिधी, गर आये आफत कोई।
ऊस आफत से भाई हमको लढते लढते जाना है।
चले चलो चले चलो........

सत्य अहिंसा न्याय निती को, कभी नही हम भूलेंगे।
बडे बडे तुफानों से हम, खेल समझकर खेलेंगे।
चलतेहि जायेंगे हम, नही बीचमे रूकना है।
चले चलो चले चलो, ये दीन दलितों
दूर हमको जाना है ॥

❖